# विलिनीकरणानंतरचा प्रवास –
# जेव्हा पाण्याला आपण हायड्रोजन होतो, याचा विसर पडतो



## पूज्य दाजी

यांनी 70 व्या जन्मदिनानिमित्त दिलेला संदेश
28 सप्टेंबर 2025, कान्हा शांतिवनम्

# विलिनीकरणानंतरचा प्रवास – जेव्हा पाण्याला आपण हायड्रोजन होतो, याचा विसर पडतो

प्रियजनहो,

बहुतेक लोकांची अशी समजूत आहे की आध्यात्मिक प्रगतीचे सर्वोच्च शिखर म्हणजे मुक्ती किंवा निर्वाण होय. हे लोभ, द्वेष, अहंकार आणि अज्ञानाच्या अग्निज्वाळांना विझविणे आहे. हे दु:ख, यातना आणि मृत्यूच्या चक्राचा अंत आहे. ही मुक्तीची अंतिम अवस्था आहे.

त्यानंतर, कबीर साहेबांच्या सांगण्यानुसार, जेव्हा आपला अहंकार मागे हटत, नि:शेष लयाला जातो, तेव्हा कुठे आपल्याला विलीन होण्याच्या शक्यतेबद्दल, थोडीफार समज येऊ लागते. कबीर साहेब हे खूप सोपे करून सांगतात. ते म्हणतात की विलिनीकरणाची ही अवस्था महासागरात पडणाऱ्या पावसाच्या थेंबांसारखी असते. महासागर कसे व्हावे, हे सांगण्यास थेंब शिल्लक नसतो.

“जेव्हा तुम्ही लयावस्था प्राप्त करता, तेव्हा तुम्हाला खऱ्या अर्थाने एक नवशिक्या म्हणता येईल,” या बाबूजींच्या धक्कादायक विधानामुळे, आपल्या कथित आध्यात्मिक ज्ञानाविषयीच्या सर्व संकल्पना कोलमडून पडतात. आपण ज्याला आध्यात्मिक

प्रगतीची सर्वोच्च परिसीमा किंवा अंतिम टप्पा समजत होतो, ती प्रत्यक्षात खरी आध्यात्मिक यात्रा आरंभ करण्यासाठीची पूर्वतयारी असते.

दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, एखादा संगीतकार, वाद्य कसे वाजवावे, त्याचे तंत्र शिकण्यात वर्षानुवर्षे घालवतो. तो खऱ्या अर्थाने केव्हा सर्जनशील होतो? तर जेव्हा तो वादनावर पूर्णपणे प्रभुत्व प्राप्त करतो तेव्हा तो व त्यांचे संगीत वेगळे उरत नाहीत. दोन्ही तद्रूप, एकाकार होतात. त्याचे संगीत केवळ तंत्रशुध्द न राहता, ती शुद्ध अभिव्यक्ती बनते.

आता प्रश्न असा आहे की: संगीतकार आणि संगीताच्या या एकरूपतेच्या पलीकडे काय असते? तर शांतता, जिथून अवघे संगीत येते आणि ज्यामध्ये ते विलीन होऊन जाते. ही नीरवता किंवा नि:शब्द शांतता नव्हे, तर ही अवघ्या सुरावटींनी ओतप्रोत असलेली शांतता होय. महान संगीतकाराला ज्ञात असते की सर्वांत परिणामकारक संगीत म्हणजे दोन सुरांच्या मधल्या जागेत घेतलेला विराम होय.



**"जेव्हा तुम्ही लयावस्था प्राप्त करता, तेव्हा तुम्हाला खऱ्या अर्थाने एक नवशिक्या म्हणता येईल."**

**–बाबूजी**

चला, आता लयावस्था किंवा विलिनीकरण म्हणजे काय आणि त्यापलीकडे काय होते, ते जाणून घेऊ.

प्रथम, आपल्याला हे जाणून घेणे आवश्यक आहे की हा विलय कोण साधू इच्छितो आणि हा अनंताचा शोध संपला आहे, हे जाणून घेण्यासाठी कोणी शिल्लक राहते का? "मी महासागर झालो आहे!" हा थेंबाचा दावा दर्शवतो की विलय अद्याप

झालेलाच नाही. खऱ्या विलिनीकरणात, असा दावा करण्यास, कोणताही "मी" शिल्लक नसतो आणि स्वतःला विरघळताना, विघटित होताना पाहण्यास, कोणतेही अस्तित्व शिल्लक नसते. थेंब म्हणू शकत नाही, "मी आता महासागर आहे." कारण असे म्हणू शकणारा "मी", अस्तित्वातच नसतो. हे मरण नव्हे; तर हे सर्वात मोठे रूपांतरण – परिवर्तन असते. असे मरण शाश्वत जीवनाकडे नेऊ शकते.

यावर क्षणभर विचार करा – "महासागर असण्याचा अनुभव कोण घेतो?" असा प्रश्न विचारणारा थेंब अस्तित्वात नसतो. हे असे विचारण्यासारखे आहे, "जेव्हा मेणबत्तीची ज्योत वणव्यात सामील होते, तेव्हा ती काय विचार करते?" या प्रश्नात, प्रश्नकर्ता कसा असू शकतो? त्याचे अस्तित्वच शिल्लक नसते.

निसर्ग, हे महान रहस्य, अगदी साध्या गोष्टींमधूनही आपल्याला दर्शवत असतो. हायड्रोजनचे उदाहरण घ्या: तो स्फोटक, धोकादायक आणि ज्वलनशील असतो. ऑक्सिजन ज्वलनाला पोषक असतो आणि आगीला अधिक वेगाने पेट घेण्यास मदत करतो. दोन्ही घातक आहेत परंतु जेव्हा ते योग्य पद्धतीने एकत्र येतात तेव्हा त्यातून काय तयार होते? पाणी! अशी जीवनदायी गोष्ट जी सर्वकाही सुरळीत राखते आणि जी अवघ्या जीवनाचा आधार असते.

आता पुढे ऐका. हायड्रोजनचे काय होते? ऑक्सिजन कुठे जातो? त्यांना नष्ट केले जात नाही, तर त्यांचे अशा गोष्टीत रूपांतर होते ज्याची त्यांच्यापैकी कोणीही, स्वतःहून कल्पनासुद्धा केली नसेल. हायड्रोजन म्हणू शकत नाही, "मी आता पाणी आहे," कारण त्या दाव्याचे समर्थन करण्यास हायड्रोजन, त्याच्या मूळ स्वरूपात शिल्लक नसतो. एक नवीन वास्तव उदयास येते, जे यांतील प्रत्येक मूळ घटकापेक्षा वेगळे असते आणि जे वेगळाच उद्देश साधते.

आता, क्लोरीन आणि सोडियम मिळून काय आश्चर्यकारक गोष्टी करू शकतात, ते पाहा! क्लोरीन हा एक विषारी वायू आहे ज्याचा युद्धात वापर केला जातो, आणि सोडियम

पाण्याच्या संपर्कात आल्यावर स्फोट पावतो. पण जेव्हा दोन्ही एकत्र येतात, तेव्हा त्या मिश्रणाचे सोडियम क्लोराईड म्हणजेच साधे मीठ तयार होते, जे मानवाच्या पेशींसाठी आवश्यक असते. या मिश्रणातून, प्राणघातक सोडियम आवश्यक बनतो व विषारी क्लोरीन सुरक्षित बनतो.

नदीचे महासागराला येऊन मिळणे, पावसाच्या थेंबांचे महासागरात पडणे, आणि हायड्रोजनचे ऑक्सिजनशी संयोग पावणे यांतून हेच दिसून येते की एकीकरण होणे, हाच एकमेव उद्देश आहे. यावरून असे दिसून येते की विलिनीकरण म्हणजे केवळ दोन गोष्टी एकत्रित करणे नव्हे ; तर त्यांच्या संयोगाने काहीतरी नवीन आणि अधिक अर्थपूर्ण बनविणे होय. विलिनीकरण म्हणजे जुनी स्वरूपे – जुन्या ओळखी सोडून देऊन, एक नवे स्वरूप – नवी ओळख धारण करणे होय, ज्याचा उपयोग प्रत्येकजण, उच्चतम उद्देशाकरिता करू शकेल.

- **एका दिव्य, उच्चतम उद्देशाकरिता स्वतःला गमावणे –** हे म्हणजे एकाने दुसऱ्यावर कब्जा करण्याबद्दल नव्हे, तर हे दोन्ही अस्तित्वांनी एका नवीन उच्चतम उद्देशात सामील होण्याकरिता आपापले स्वरूप सोडून देण्याबद्दल होय. असा विचार करा की तुम्ही असे काहीतरी सोडून देत आहात, अर्पण करत आहात, ज्यामुळे तुम्हाला परिपूर्णता वाटेल.

- **केवळ मिश्रण नव्हे, तर अवस्थेतील बदल –** सामान्य विलिनीकरण म्हणजे एखादा नवीन रंग तयार करण्याकरिता, दोन भिन्न रंगांचे मिश्रण करणे. दुसरीकडे, दिव्य विलिनीकरण म्हणजे दोन गोष्टी एकत्र येऊन, त्यायोगे संपूर्णत: नवीन गोष्ट बनविणे, जसे हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांचा संयोग होऊन पाणी बनते. ते केवळ “एकमेकांमध्ये मिसळत” नाहीत; तर ते आमूलाग्र बदलतात.

- **अनपेक्षित परिणाम –** याप्रकारे दिव्य बनलेले अस्तित्व अशा गोष्टी करू शकते, ज्या मूळ अस्तित्वांपैकी, कोणीही, स्वतःहून करू शकले नसते. नवीन अस्तित्वात नवीन क्षमता, एक नवीन मन, किंवा एक नवीन ध्येय असते, जे विलिनीकरणापूर्वी त्याच्यामध्ये असू शकले नसते.

जेव्हा बाबूजी म्हणतात की विलिनीकरण, ही तर फक्त सुरुवात आहे, तेव्हा अनेक लोकांना धक्काच बसतो. “गुरुदेव,” ते म्हणतात, “जर एक होणे – एकत्व हा शेवट नव्हे, तर मग यापुढे काय असते?”

**दिव्य विलिनीकरण म्हणजे दोन गोष्टी एकत्र येऊन, त्यायोगे संपूर्णतः नवीन गोष्ट बनविणे, जसे हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांचा संयोग होऊन पाणी बनते. ते केवळ “एकमेकांमध्ये मिसळत” नाहीत; तर ते आमूलाग्र बदलतात.**

अनुभवातून मी जे शिकलो आहे ते असे –

प्रथम येते विलिनीकरण, जे महासागराने, नदीचे मुक्तहस्ते स्वागत करण्यासारखे होय. पुसटशी का असेना परंतु आपण नदी असल्याची आठवण अजूनही असते. विचार करा की नदीचे हे वाहणे त्याच लोकात म्हणजे त्याच घरी परतण्याकरिता असते, सालोक्यता.

मग, जसजसे आपण परिपक्व होतो, तसतसे आपण तद्रूप होतो, आणि आपल्या पूर्वीच्या स्वरूपाची, वेगळेपणाची आठवणही नाहीशी होते. सोडियमला, आता

सोडियम असल्याचे आठवत नाही. ते फक्त मीठ असते, आणि त्याला त्याच्या स्फोटक स्वभावाकडे परत जाण्याची इच्छा नसते.

हे सामीप्यतेकरिता पुरेसे नाही. सामीप्यता – या टप्प्यावर, आपली वैयक्तिक इच्छा उरलेली नसते आणि एकीकरण इतके परिपूर्ण असते की त्या पात्रातून दैवी इच्छा, कोणत्याही अवरोधाविना किंवा अगदी प्रवाहाचे भानही न राहता स्वाभाविकपणे वाहते. ते कशालाही दूर ढकलत नाही; ते सर्वकाही धारण करते, अगदी अवकाशाप्रमाणे.

आणि यापेक्षाही कितीतरी अधिक... अहा, शब्दांतून ते मांडता येणार नाही. हायड्रोजन आणि ऑक्सिजनला, सजीवांची काळजी घेणे म्हणजे काय, हे पाणी कसे काय सांगू शकते? मीठ हे सोडियम आणि क्लोरीनला अन्न ताजे ठेवण्याचा आणि रक्ताचे नाजूक संतुलन राखण्याचा आनंद किती मोठा असतो, हे कसे काय सांगू शकते?

पाश्चात्य तत्त्वज्ञान “शून्यतेला” एक भयावह अनस्तित्व किंवा काहीही नसणे, असे मानते परंतु आपण त्याला सर्वात सक्रिय परिपूर्णता म्हणून ओळखतो. जेव्हा हायड्रोजन आणि ऑक्सिजन मिसळून त्याचे पाणी तयार होते, तेव्हा त्या दोन्ही घटकांचे रूपांतर  “काहीही नाही” या स्वरूपाचे असते का? नाही! ते संपूर्ण परिसंस्थेला किंवा इकोसिस्टिमला मदत करू शकतात. विलिनीकरणानंतरच्या अहंकाराची शून्यता अशीच जाणवते: ती रिकामी नसते, तर ती इतकी परिपूर्ण असते की ती जाहीर करण्याची गरज नसते.

विलिनीकरणाच्या पलीकडे गेलेली साक्षात्कारी व्यक्ती “मी ज्ञानी आहे!” असे म्हणत फिरत नाही. पाण्याला “मी $H_2O$ आहे!” असे म्हणण्याची गरज नसते. ते वाहते, पोषण करते, स्वच्छ करते आणि आधार देते; त्याचे अस्तित्वच बोलके असते.

**विलिनीकरणाच्या पलीकडे गेलेली साक्षात्कारी व्यक्ती "मी ज्ञानी आहे!" असे म्हणत फिरत नाही. पाण्याला "मी $H_2O$ आहे!" असे म्हणण्याची गरज नसते. ते वाहते, पोषण करते, स्वच्छ करते आणि आधार देते; त्याचे अस्तित्वच बोलके असते.**

आता, विचार करण्यासारखी एक गोष्ट अशी आहे – ध्येय महासागर बनण्याचे नाही. मुद्दा हा आहे की तुम्ही कधीही थेंब नव्हताच, हे जाणले पाहिजे. तुम्ही नेहमीच तो महासागर होतात व असे असूनही स्वतःला थेंब समजत होतात. परंतु हे ज्ञान, हा शेवट नसून ही तर खऱ्या कार्याची केवळ सुरुवात आहे.

आपण महासागर आहोत, असा साक्षात्कार झाल्यावर तुम्हाला जाणीवपूर्वक थेंब होता आले पाहिजे. यावेळी, तुम्ही ते अज्ञानातून नाही, तर परमज्ञानातून कराल. हेच मुक्त आत्मा व बद्ध आत्मा यांतील वेगळेपण ठळकपणे दर्शवते. एक व्यक्ती जे पाहते, त्यावर विश्वास ठेवते, तर दुसरी व्यक्ती इतरांना स्वप्न पाहता यावे, या दिव्य उद्देशाने आपली भूमिका बजावते. बाबूजी म्हणतात, "जेव्हा मी बोलतो, तेव्हा मला नेहमीच नवल वाटते की कोण बोलत आहे: लालाजी, मी, की अन्य कोणीतरी?" या सगळ्यातून एक गोष्ट मात्र, निश्चित आहे की आपले "मी-पण" निघून जाते.

तुम्ही विचार करत असाल, "या कल्पना तर खूप छान आहेत, पण मला अजूनही दररोज सकाळी वाहतूक कोंडी आणि इतर समस्यांना तोंड द्यावे लागते." हाच, तर मुद्दा आहे. महासागराने स्वत:ला, प्रत्येक थेंबाच्या स्वरूपात कसे अनुभवायचे, हे शिकण्याची गरज आहे, तेही आपल्या मानवी अवताराच्या मर्यादांची पूर्णत: जाणीव ठेवून; आणि त्याच वेळी शाश्वत अंतरात्म्याशी जोडलेले राहून, अमर्याद दिव्यत्वात स्थित राहून.

**ध्येय महासागर बनण्याचे नाही. मुद्दा हा आहे की तुम्ही कधीही थेंब नव्हताच, हे जाणले पाहिजे. तुम्ही नेहमीच तो महासागर होतात व असे असूनही स्वतःला थेंब समजत होतात. परंतु हे ज्ञान, हा शेवट नसून ही तर खऱ्या कार्याची केवळ सुरुवात आहे.**

“पण दाजी,” तुम्ही विचाराल, “हे आपण प्रत्यक्षात कसे करावे?”

पाण्यासारखे बना. पाणी कोणाला मदत करावी हे निवडत नाही. ते म्हणत नाही, “मी फक्त सोन्याच्या वाहिन्यांमधूनच वाहत जाईन.” ते सारखेच राहते परंतु प्रत्येक पात्रात स्वतःला व्यवस्थित सामावून घेण्यासाठी, केवळ, आकार बदलते. गरम केल्यावर, ते वाफ म्हणून कोणत्याही अडचणीविना वर जाते. थंड झाल्यावर ते सहजपणे गोठते. पण या सर्व बदलांसहसुध्दा, ते त्याचे मूळ, खरे स्वरूप कधीही विसरत नाही – ते म्हणजे जीवनप्रवाह चालू ठेवण्याचा एक मार्ग.

सोडियमने तुम्हाला काय शिकविले, ते नेहमी लक्षात ठेवा: पाणीसुद्धा, जे जीवनासाठी महत्त्वाचे आहे, ते चुकीच्या घटकाच्या संपर्कात आल्यावर घातक ठरू शकते. आध्यात्मिक यात्रेकरिता पाण्याची लवचिकता आणि आपल्याला बदलण्यात साहाय्य करण्यासाठी योग्य व्यक्ती निवडण्याचे ज्ञान, या दोन्हींची आवश्यकता असते. हेच तत्त्व विवाहाच्या बाबतीतही लागू होते. कल्पना करा की सोडियम हे क्लोरीनसोबत एकत्र येण्याऐवजी, पाण्याच्या संपर्कात आले तर काय होईल ! धमाका...

विलिनीकरणानंतर काय होते? त्याच गोष्टी ज्या पाण्याच्या पलीकडे आहेत, अशा अनेक गोष्टी ज्या पाणी बनू शकते आणि करू शकते. श्वास रोखून धरायला लावणारी

**पाण्यासारखे बना. पाणी कोणाला मदत करावी हे निवडत नाही. ते म्हणत नाही, “मी फक्त सोन्याच्या वाहिन्यांमधूनच वाहत जाईन.” ते सारखेच राहते परंतु प्रत्येक पात्रात स्वतःला व्यवस्थित सामावून घेण्यासाठी, केवळ, आकार बदलते.**

**आध्यात्मिक यात्रेकरिता पाण्याची लवचिकता आणि आपल्याला बदलण्यात साहाय्य करण्यासाठी योग्य व्यक्ती निवडण्याचे ज्ञान, या दोन्हींची आवश्यकता असते.**

बर्फाची सुंदर शिल्पे, प्रचंड इंजिने चालवणारी वाफ, कोरड्या धरतीवर पाऊस आणणारे ढग, प्रचंड दऱ्या कोरणाऱ्या नद्या, आणि संपूर्ण सूर्याचे प्रतिबिंब दाखवणारे दवबिंदू.

विलिनीकरणानंतरच्या अवस्थेत अनेक गोष्टी घडू शकतात. एकत्रित होण्यापूर्वी हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांचे स्वतंत्र अस्तित्व असते व त्यांच्या संयोगाने आत्तापर्यंतचे किंवा भविष्यातही असेल, एवढे पाणी ते बनवू शकतात. सिंफनी किंवा वाद्यमेळ सुरू होणार असतो व त्यामध्ये प्रत्येक संभाव्य सुरावट असते.

जेव्हा दोन महान शून्यता एकत्र येतात, तेव्हा काय होते? तार्किक उत्तर असे आहे की काहीही शिल्लक राहत नाही. पण हे “काहीही नाही” म्हणजे शून्य नव्हे. अनंत ही एक गणितीय संकल्पना आहे जी सांगते की अनंत आणि अनंत यांची बेरीज अनंतच राहते,  ती “दोन अनंत” होत नाही.

जेव्हा गणितज्ञांना ज्ञात झाले की अनंताचे वेगवेगळे आकार आहेत, तेव्हा त्यांना एक गहन आध्यात्मिक सत्य उलगडले. विलिनीकरणाच्या पलीकडे केवळ अनंत गोष्टी नाहीत, तर अनंतांचे अनंत आहेत आणि प्रत्येक अनंत हे वेगळे व सर्वसमावेशक आहे. म्हणूनच, विलिनीकरणानंतरचा प्रवास कधीच संपत नाही.

मी तुम्हाला हेच सांगू इच्छितो – थेंब महासागर बनत नाही; तर थेंबाला उमजते की तो सदैव महासागरच होता. पण हा शोध म्हणजे अनंताच्या विद्यापीठातील शाळेचा पहिलाच दिवस होय. यापलीकडे काय?

पलीकडच्याही पल्याड जाऊन आलेले तुम्हाला हे सांगू शकतात. त्यांना हे उमजलेले असते की शब्दांपेक्षा मौन किंवा शांतता अधिक बोलकी असते, उपदेश करण्यापेक्षा उपस्थितीतून अधिक शिकवण मिळते आणि सर्वांत महान शक्ती म्हणजे कोणतीही शक्ती नसणे, केवळ प्रेम, जे हायड्रोजन आणि ऑक्सिजनचा शाश्वत – चिरंतन खेळ आहे, एकमेकांमध्ये विरघळणे आणि जीवन म्हणून पुन्हा प्रकट होणे.

हीच गोष्टी उलगडत जाण्याची जादू आहे. हाच तो मार्ग आहे, जो मार्गाच्या पल्याड जातो. म्हणूनच जेव्हा तुम्ही विचारता, “विलिनीकरणानंतर पुढे काय होते?” तेव्हा मी केवळ हसतो. याविषयी काहीही बोलण्याची गरज नाही; तर तुम्हाला या प्रश्नाचे उत्तर बनण्याची गरज आहे.

**विलिनीकरणाच्या पलीकडे केवळ अनंत गोष्टी नाहीत, तर अनंतांचे अनंत आहेत आणि प्रत्येक अनंत हे वेगळे व सर्वसमावेशक आहे. म्हणूनच, विलिनीकरणानंतरचा प्रवास कधीच संपत नाही.**

आणि जेव्हा तुम्ही ते बनाल, तेव्हा तुम्हाला उमजेल की सदगुरू काहीच सांगत नाहीत, असे का? ते तुम्हाला केवळ पेलाभर पाणी देतात आणि ते किती उत्तम आहे, हे तुम्हाला उमजण्याची वाट पाहतात. जेव्हा तुम्ही तो पाण्याचा पेला हातामध्ये धराल, तेव्हा हायड्रोजन आणि ऑक्सिजन कसे वेगळ्याच पदार्थात रूपांतरित होत आहेत, याचा विचार करा. तुम्हीच तो महासागर आहात, आणि तो किती स्वच्छ आहे, हे पाहून तुम्हालाच नवल वाटते. तुम्हीच ते दिव्यत्व आहात, हे वास्तव तुम्हाला हळूहळू उलगडत जाते.

आणि याचा साक्षात्कार होताच, सर्वात विलक्षण गोष्ट घडते: सामान्य गोष्ट पवित्र, दिव्य बनते, दुसऱ्या कशात रूपांतर होऊन नव्हे, तर ती सदैव, निरंतर जी होती – जे दिव्यत्वच होती, हे वास्तव स्वत:चे स्वत:च उमजून.

सर्व विलिनीकरणांच्या पलीकडे असलेल्या परमशांततेत, तो आपल्याला योग्य मार्ग निवडण्याची विवेकबुध्दी देवो.

पूज्य सदगुरूंच्या चरणी प्रार्थना,
कमलेश

